# परसातील कुक्कुटपालन- सुधारित मार्गदर्शन सूचना

(प्रकल्प उपक्रम सांकेतांक-A2.5.2)

**प्रस्तावना**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदला विषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्प भू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

कुक्कुटपालन हा शेतीस पूरक व्यवसाय म्हणून ओळखला जातो. ग्रामीण भागातील परसातील कुक्कुटपालनाद्वारे शेतकऱ्यांना व भूमिहीन **कुटुंबातील लाभार्थ्यांना** हमखास पूरक उत्पन्नाचे साधन उपलब्ध झालेले आहे.

**उद्देश:**

१. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये समावेश करण्यात आलेल्या गाव समूहामधील भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, अनुसूचित जाती/जमाती मधील महिला शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास स्वयंरोजगाराच्या माध्यमातून सक्षम बनविणे.

२. ग्रामीण भागातील भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या महिला व घटस्फोटीत महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.

३. ग्रामीण भागातील परसातील कुक्कुटपालन व्यवसायास चालना मिळावी व लाभार्थी कुटुंबाना प्रथिनेयुक्त आहार मिळावा.

**लाभार्थी निवडीचे निकष**

प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावातील ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेले भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या महिला, घटस्फोटीत महिला, अनुसूचित जाती/जमाती मधील महिला शेतकरी यांना लाभ देय राहील.

**अर्थसहाय्य :**

**सदर घटकांतर्गत देशी वाणांच्या कोंबडीची चार आठवडे वयाची पिल्ले घेणे अभिप्रेत आहे. चार आठवडे वयाच्या पिलाची किंमत रु. १००/- प्रती पक्षी मर्यादेत निर्धारित करणेत येत आहे. एका पिलाच्या निवाऱ्यासाठी १ चौ.फुट जागा आवश्यक आहे. एका लाभार्थ्यास जास्तीत जास्त १०० पक्षांसाठी अर्थसहाय्य देय आहे. जुने पक्षी असतील तर जुने व नवीन मिळून एकूण १०० पक्षी होतील या मर्यादेपर्यंत नवीन पक्षांची खरेदी करता येईल. नव्याने खरेदी केलेल्या पक्षांसाठी व त्यांच्या निवाऱ्यासाठीच अनुदान देय राहील. या घटकांतर्गत ५० किंवा ५० पेक्षा जास्त पक्षी खरेदी करणे अनिवार्य आहे. निवाऱ्यासाठी रु. ७०/- प्रती चौ.फुट प्रमाणे मापदंड असून आवश्यकता असल्यास लाभार्थ्याने स्वत:च्या जागेवर स्वत:चे अथवा बाजारातून साहित्य उपलब्ध करून निवाऱ्याची सोय करावयाची आहे.**

**खुल्या प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी प्रकल्प खर्चाच्या ५०% व अनुसूचीत जाती/जमातीतील लाभार्थ्यांसाठी प्रकल्प खर्चाच्या ७५% अनुदान देय आहे.**

**एका लाभार्थ्याने १०० पक्षी खरेदी करून निवाऱ्याची सोय केल्यास पक्षी खरेदीसाठी रु. १००००/- व निवाऱ्यासाठी रु. ७०००/- खर्चाचा मापदंड आहे. त्यानुसार खुल्या प्रवर्गातील लाभार्थ्यासाठी एकूण खर्च रु. १७०००/- च्या ५०% म्हणजेच रु. ८५००/- तर अनुसूचित जाती/जमातीतील लाभार्थ्यांसाठी ७५% म्हणजेच रु. १२७५०/- अनुदान देय आहे. मापदंडाव्यतिरिक्त जादाचा खर्च लाभार्थ्याने स्वत: करावयाचा आहे. या घटकासाठी अर्ज केलेल्या परंतु अदयाप पक्षी खरेदी न केलेल्या लाभार्थ्यांना वरीलप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.**

**अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या**

**लाभार्थी**

१. इच्छुक लाभार्थीने घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठीचा प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून अर्ज सादर करावा व आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.
२. पूर्वसंमती मिळाल्या पासून एक महिन्याच्या आत पक्षी खरेदी करून ऑनलाईन अनुदान मागणी करावी.
३. निवडलेल्या लाभार्थीने **ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावर** गठीत खरेदी समितीच्या उपस्थितीत पक्षी खरेदी करावी.
४. **पक्षी खरेदी स्थानिक बाजारामध्ये करून ज्या गावामधील बाजारात पक्षी खरेदी केली आहे त्या ग्रामपंचायतीची पक्षी खरेदी बाबतची तपशिलासह पावती सादर करणे आवश्यक आहे. लाभार्थीच्या पसंतीनुसार दिलेल्या मापदंडानुसार देशी वाणाची पिल्ले ही स्थानिक पुरवठादाराकडून / अंडी उबवणी केंद्राकडून ग्राम कृषि संजीवनी समिती स्तरावरील पक्षी खरेदी समिती समवेत खरेदी करू शकतो.**
५. **पक्ष्यांसाठी आवश्यक आकारमानाच्या निवाऱ्याची सोय स्थानिक अथवा बाजारातून साहित्य घेऊन करावयाची आहे .**
६. परसबागेतील कुक्कुटपालन या घटकांतर्गत अनुदान मिळणेसाठी ऑनलाईन मागणी करावी. सोबत खरेदी देयकांच्या मूळप्रती व खरेदी समितीचे प्रमाणपत्र लाभार्थ्याने स्व:साक्षांकीत करुन ऑनलाईन अपलोड कराव्यात.
७. **पक्षी खरेदीनंतर वाहतुकीचा खर्च लाभार्थीने स्वत: करावयाचा आहे.**

**पक्षी खरेदी समिती :**

१. सरपंच - पदसिद्ध अध्यक्ष
२. उपसरपंच - पदसिद्ध सदस्य
३. ग्राम कृषि संजीवनी समिती (VCRMC) सदस्यांपैकी एक महिला सदस्य - सदस्य
४. कृषि मित्र/कृषि ताई - सदस्य
५. कृषि सहाय्यक - सचिव
६. पशुसंवर्धन विभागाचे संबधित पशुधन विकास अधिकारी/पशुधन पर्यवेक्षक-सदस्य
(अनुक्रमांक १, २, ३ पैकी किमान १ सदस्य, कृषि मित्र/कृषि ताई, कृषि सहाय्यक, पशुसंवर्धन विभागाचे संबधित पशुधन विकास अधिकारी/पशुधन पर्यवेक्षक व लाभार्थी यांची खरेदीच्या वेळी उपस्थिती अनिवार्य)

**खरेदी समितीच्या कार्य व जबाबदाऱ्या :**

१. खरेदी समितीने पक्षी खरेदी कोणत्या बाजार समितीमधून करावयाची आहे याबाबत निर्णय उपविभागीय कृषि अधिकारी यांचे मार्गदर्शनानुसार घ्यावा.
२. गावातील निवडलेल्या सर्व लाभार्थ्यांची पक्षी खरेदी शक्यतो एकाचवेळी करावी.
३. लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष पक्षी खरेदी केली असल्याबाबतचे प्रमाणपत्र पक्षी खरेदी समितीने सादर करावे.
४. **पक्षी खरेदी करताना खरेदी समितीचा जाण्या येण्याचा खर्च राज्य परिवहन महामंडळाच्या बसच्या दरानुसार ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) निधीतून करावा.**

**ग्राम कृषि संजीवनी समिती**

१. इच्छुक भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परितक्त्या महिला, घटस्फोटीत महिला, अनुसूचित जाती/ जमाती मधील महिला शेतकरी लाभार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करणे व लाभार्थी निवड करणे.
२. भूमिहीन कुटुंबातील व्यक्तीसाठी तलाठी**/तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र** व इच्छुक लाभार्थ्याने दिलेले सोबतच्या नमुन्यातील स्वयंघोषणा पत्र या आधारे लाभार्थी निवडीबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.
३. विधवा, परितक्त्या महिला व घटस्फोटीत महिलांना लाभ ग्रामसेवक यांचे अभिप्राय व इच्छुक लाभार्थ्याचे सोबतच्या नमुन्यातील स्वयंघोषणा पत्र घेऊन त्या आधारे लाभार्थी निवडीबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.
४. प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांच्या कागदपत्रांची छानणी करून अर्जाच्या पात्र/अपात्रते बाबत निर्णय घ्यावा. अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
५. पक्षी खरेदी समिती नियुक्त करून तिच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
६. **पात्र इच्छुक लाभार्थ्यांची यादी व अनुदान प्राप्त लाभार्थ्यांची यादी दर्शनी भागात लावण्यात यावी.**
७. सामाजिक लेखापरीक्षण करणे.

**समूह सहाय्यक**

१. इच्छुक लाभार्थी यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेतस्थळावर https://dbt.mahapocra.gov.in ऑनलाईन नोंदणी व अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.
२. इच्छुक लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी व त्यांनी अपलोड केलेल्या कागदपत्रांची छानणी लाभार्थी निकषानुसार करावी.
३. सर्व ऑनलाईन प्राप्त अर्ज ग्राम कृषि संजीवनी समिती समोर मान्यतेसाठी सादर करणे व मंजुरी प्राप्त झाल्यानंतर तसा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे.
४. लाभार्थ्यांस "परसातील कुक्कुटपालन" या घटकाच्या अटी शर्ती, **तांत्रिक निकष, देय अनुदान** अंमलबजावणी बाबत समजावून सांगावे.
५. **ज्या लाभार्थीनी पूर्वीच अर्ज केले आहे परंतु अदयाप खरेदी केलेली नाही त्यांना नव्याने मिळणाऱ्या अर्थसहाय्याबाबत समक्ष भेटून अवगत करावे.**
६. संबंधित कृषि सहाय्यक यांना पक्षी खरेदी व खरेदी पश्चात अंतिम तपासणीसाठी मदत करणे
७. पात्र लाभार्थ्यांना पूर्वसंमती बाबत अवगत करणे.

**कृषि सहाय्यक**

१. लाभार्थीने ऑनलाईन अर्ज व सोबत अपलोड केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छानणी आधारे पात्र अर्जांच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी **करताना निवड झालेल्या लाभार्थ्याकडे यापूर्वी पक्षी आहेत किंवा नाही याबाबत खातरजमा करून व मागणी रास्त असल्याची खात्री करून प्रपत्र-१ नुसार** प्रकल्प स्थळ कुक्कुट पालनासाठी योग्य आहे

किंवा नाही, याबाबत ऑनलाईन नोंद करावी. DBT App द्वारे **प्रकल्प स्थळाच्या नैऋत्य कोपऱ्यावरून लाभार्थी व कृषि सहाय्यकाच्या छायाचित्रासह** भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे. यापूर्वी कुक्कुटपालनाचा इतर शासकीय योजनेतून लाभ घेतला आहे काय, याबाबत खातरजमा करून याबाबतचा तपशिल नमूद करावा.

३. कृषि सहाय्यक यांनी खरेदी करण्यात आलेले पक्षी मार्गदर्शक सूचनेनुसार योग्य असल्याबाबत व खरेदी प्रक्रिया योग्य असल्याबाबत मोका तपासणी अहवाल संकेतस्थळावर अनुदानाच्या शिफारशीसह उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा. तसेच प्रकल्पाच्या DBT App द्वारे प्रकल्प स्थळाच्या नैऋत्य कोपऱ्यावरून अक्षांश/रेखांशसह **लाभार्थी, कृषि सहाय्यक व खरेदी केलेल्या पक्ष्यांच्या छायाचित्रासह** भौगोलिक स्थानांकन (Geo-tagging) करून संकेतस्थळावर अपलोड करणे.

**४. आवश्यक आकारमानाच्या निवाऱ्याची सोय लाभार्थ्याकडे स्वत: च्या जागेवर उपलब्ध केल्याची खात्री करून यासाठीचे देय अर्थसहाय्य देण्यासाठी शिफारस करावयाची आहे.**

**५. ज्या लाभार्थ्यांनी अर्ज केला आहे परंतु अदयाप पक्षी खरेदी केलेली नाही त्यांना नव्याने मिळणाऱ्या लाभाबाबत अवगत करावे.**

**६. अनुदान मागणीसाठी दि.१६/३/२०१९ च्या सूचनेनुसार साक्षांकित देयके व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करणे.**

### कृषि पर्यवेक्षक

कृषि सहाय्यक यांनी ऑनलाईन अवगत केल्यानंतर कृषि पर्यवेक्षक यांनी यादृच्छिक (Random) पद्धतीने १०% लाभार्थ्याची अनुदान अदायगी पूर्वी तपासणी करावी व याबाबतच्या नोंदी खात्री करून प्रमाणित कराव्यात. अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून देय अनुदान अदायगीसाठी योग्य असलेबाबत खात्री करून पर्यवेक्षकीय अहवाल सादर करावा.

### उपविभाग स्तर (लेखाधिकारी)

अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

### उपविभागीय कृषि अधिकारी

१. ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) मान्यतेने प्राप्त झालेल्या लाभार्थींच्या कागदपत्रांची छाननी नंतर पात्र/अपात्रते बाबत निर्णय घेऊन संबंधित लाभार्थी यांना ऑनलाईन पूर्वसंमती प्रदान करावी. लाभार्थी अपात्र असल्यास कारणे नमूद करावीत.

२. तपासणी अहवालासह ऑनलाईन शिफारस झालेल्या पात्र प्रस्तावांची देय अनुदान अदायगी DBT द्वारे थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर वर्ग करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन कक्षास शिफारस करावी.

३. कृषि सहाय्यक यांनी अवगत केल्यानंतर यादृच्छिक (Random) पद्धतीने २% लाभार्थ्यांची अनुदान अदायगी पूर्वी तपासणी करावी.

४. आवश्यकतेनुसार सदर घटकाचे निवडलेल्या लाभार्थ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करावे.

५. योजनेचे संनियंत्रण करणे.

### प्रकल्प संचालक, आत्मा

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.

२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची यादृच्छिक (Random) पद्धतीने उपविभागात किमान १० लाभार्थ्यांची तपासणी करावी.

## योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

१. **प्रकल्प कालावधीत या घटकाचा एका लाभार्थीस एकदाच लाभ घेता येईल.**
२. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात येईल.
३. या घटकांतर्गत छाब्रो, कलिंगा ब्राऊन, कावेरी, ग्रामप्रिया, वनराज, कॅरी गोल्ड, निर्भिक, हितकारी, कॅरी देवेंद्र, कडकनाथ, उपकारी, गिरीराज, गिरीराणी, सुवर्णधारा, नंदनम ९९, ग्रामलक्ष्मी, ग्रामश्री, कृषिप्रिया, राजश्री, सातपुडा देशी, रेनबो रुस्टर, कुरोलायर, क्षिप्रा व वेळोवेळी अंतर्भाव केलेल्या शासन मान्य केलेले लो इनपुट टेक्नोलॉजीचे पक्षी मदर युनिट/मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र/सघन कुक्कुट विकास गट यांचे मार्फत चार आठवड्यांपर्यंत वाढवून ते पुरवठा करण्यास प्राधान्य देण्यात यावे. ते उपलब्ध होत नसतील तर स्थानिक पातळीवर लाभार्थीच्या पसंतीनुसार पक्षी पुरवठा करण्यात यावेत. सदर खरेदी ग्राम कृषि संजीवनी समितीच्या (VCRMC) खरेदी समिती मार्फत करण्यात यावी.
४. या घटकास नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर, ग्रामसभा कार्यालयातील नोटीस बोर्ड, मेळावे इत्यादीद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.
५. या घटकांतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यांना आवश्यकता असल्यास कुक्कुट पालनाचे आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
६. लाभार्थ्याने सदरचा व्यवसाय हा किमान ३ वर्षे करणे आवश्यक आहे.
७. पक्षी जोपासण्यासाठी खाद्य व पाण्याची भांडी इ. व्यवस्था लाभार्थ्यांने स्वतः करावयाची आहे.
८. या घटकांतर्गत लाभार्थ्यांना पुरवठा केलेल्या कुक्कुट पक्ष्यांना लसीकरण व आवश्यक त्या पशुवैद्यकीय सेवा जवळच्या पशुवैद्यकीय संस्थेमार्फत देण्यात याव्यात.

**प्रपत्र – १**

**प्रकल्प स्थळ पाहणी व पात्रतेबाबत अभिप्राय**

श्री/ श्रीमती------------------------------------------------------- यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत -------------------------------- घटकासाठी अर्ज केलेला आहे. **सदर लाभार्थ्याकडे सध्या ------ पक्षी असून/नसून , लाभार्थ्याने मागणी केलेली संख्या ---------ही मार्गदर्शक सूचनेनुसार रास्त आहे. सदर घटकासाठी लाभार्थ्याकडे स्वत:ची पुरेशी जागा उपलब्ध आहे.** यापूर्वी सदर घटकाचा इतर शासकीय योजनेतून लाभ घेतलेला आहे/ नाही. सदर अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) दिनांक -------रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर केलेला आहे. सदर लाभार्थी योजनेच्या निकषाप्रमाणे पात्र आहे. दिनांक ---------------- रोजी भेट देऊन प्रकल्प स्थळाची पाहणी केली असता --------------------------------- घटकासाठी आवश्यक साधन सामुग्री लाभार्थ्याकडे उपलब्ध असून प्रकल्प राबविण्यासाठी लाभार्थी सक्षम व पात्र आहे. त्यामुळे सदर लाभार्थ्यास पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे.

**कृषि सहाय्यक**
**नाव**
**स्वाक्षरी**
**दिनांक**

**प्रपत्र -२**

**पूर्वसंमती पत्र**

घटक- परसबागेतील कुक्कुटपालन

(प्रकल्प उपक्रम सांकेतांक- A2.5.2)

कार्यालय- उपविभागीय कृषि अधिकारी, ____
उपविभाग ________, जिल्हा_______
दिनांक - / /२०----

प्रति,
श्री/श्रीमती-----------------------------------------
मु.पो.------------------तालूका --------------------
जिल्हा -------------

| | | |
|---|---|---|
| १. | आपल्या अर्जाचा दिनांक | |
| २. | मागणी अर्जाचा क्रमांक | |
| ३. | मागणी केलेला घटक | |
| ४. | मागणी केलेल्या घटकाचा कोड | |
| ५. | ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) लाभार्थी निवड आणि अर्जाला मान्यता देण्याचा दिनांक | |
| ६. | अर्जानुसार ८-अ चा क्रमांक | |
| ७. | घटक राबवावयाचा गट क्र./सर्व्हे नं. | |
| ८. | स्थळ पाहणी करून कृषि सहाय्यकाने शिफारस केल्याचा दिनांक | |
| ९. | घटक राबविण्यासाठीचा कालावधी (दिवस) | |

वरील अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते कि, ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC( वरील ठरावान्वये आपली लाभार्थी म्हणून निवड केलेली आहे. सदर निवड आपण प्रकल्पाच्या अटी व शर्तीच्या पूर्तता करण्याचे अधिन राहून करण्यात आली आहे. आपल्या मागणीनुसार परसबागेतील कुक्कुटपालन या बाबीसाठी प्रकल्पांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार अनुज्ञेय रकमेसाठी पूर्वसंमती देण्यात येत आहे. सदरचे पूर्वसंमतीपत्र दिल्याच्या तारखेपासून दिलेल्या मुदतीत ग्राम कृषि संजीवनी समिती मार्फत नियुक्त खरेदी समिती समवेत पक्षी खरेदी करणे आवश्यक आहे. सदर घटकासाठी लाभार्थ्याने सर्व खर्च अगोदर करावयाचा आहे. घटकाची अंमलबजावणी पूर्ण करून आवश्यक कागदपत्र https://dbt.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर किंवा DBT app वर अपलोड करून अनुदान मागणी करणे आवश्यक आहे. विहित मुदतीत खरेदी पूर्ण न केल्यास आपणास दिलेले पूर्वसंमती पत्र आपोआप रद्द समजण्यात यावे.

सदर घटकाची अंमलबजावणी मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर आपला प्रस्ताव प्रत्यक्ष मोका तपासणीनुसार देय अनुदानासाठी पात्र राहिल. आपला प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड/प्रत्यक्ष खर्चानुसार अनुज्ञेय अनुदान निधी उपलब्धतेनूसार मंजूर करण्यात येईल. सदरचे अनुदान आपल्या आधार संलग्न बँक खात्यावर DBT द्वारे जमा करण्यात येईल. आपल्या प्रस्तावास मंजूरी देणे, देय अनुदानाची रक्कम/देय कालावधी इत्यादी बाबी ठरविण्याचा अंतिम अधिकार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प/शासनाचा राहील.

घटक अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना www.mahapocra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी संबधित कृषि सहाय्यक यांचेकडे संपर्क साधावा.

**उपविभागीय कृषि अधिकारी,**
**उपविभाग________**
**जिल्हा: __________**

## प्रपत्र- ३
## खरेदी समितीने द्यावयाचे खरेदी प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, लाभार्थी श्री/श्रीमती------------------------------------------- मु.पो.---------------------तालूका --------------------- जिल्हा ------------- यांनी कुक्कुटपालन या घटकांतर्गत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत या घटकासाठी विहित केलेल्या खरेदी समिती व खरेदी समिती सचिव (कृषि सहाय्यक) यांच्या समक्ष **सदर घटकासाठी निर्गमित केलेल्या** मार्गदर्शक सूचनांना अनुसरून **एकूण -----------पक्षी खरेदी करणेचे काम समाधानकारकरित्या पूर्ण केलेले आहे.**

खरेदी केलेल्या पक्ष्यांची संख्या -

एकूण किंमत रु. -

(अक्षरी रु. )

| | | | |
|---|---|---|---|
| | **(स्वाक्षरी)**<br>**लाभार्थी** | **(स्वाक्षरी)**<br>**खरेदी समिती सचिव**<br>**(कृषि सहाय्यक)** | **(स्वाक्षरी)**<br>**उपस्थित खरेदी समिती सदस्य** |
| दिनांक–<br>ठिकाण– | **(नाव )** | **(नाव )** | **(नाव )** |

| | |
|---|---|
| **(स्वाक्षरी)**<br>**उपस्थित खरेदी समिती**<br>**कृषि मित्र/ कृषि ताई** | **(स्वाक्षरी)**<br>**पशुसंवर्धन विभागाचे**<br>**संबधित पशुधन विकास**<br>**अधिकारी/पशुधन**<br>**पर्यवेक्षक** |
| **(नाव )** | **(नाव )** |

## प्रपत्र - ४
## मोका तपासणी अहवाल
## (कृषि सहाय्यक यांनी करणे)

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="2">बाब</th><th>तपशील</th></tr>
<tr><td>१.</td><td colspan="2">लाभार्थ्याचे नाव</td><td></td></tr>
<tr><td>२.</td><td colspan="2">गावाचे नाव</td><td></td></tr>
<tr><td>३.</td><td colspan="2">तपासणी दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>४ .</td><td colspan="2">बाब</td><td>परसबागेतील कुक्कूटपालन</td></tr>
<tr><td>५.</td><td colspan="2">पूर्वसंमती क्र.व दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>६.</td><td>परसबागेतील कुक्कूटपालन या बाबतचा तपशील</td><td>१ लाभार्थीची स्वतःच्या जुन्या पक्षांची संख्या<br>२ नव्याने घेतलेल्या पक्षांची संख्या<br>३ नव्याने घेतलेल्या कोंबड्यांची जात/वर्ग<br>४ नव्याने घेतलेल्या पक्ष्यांच्या वया बाबतचा तपशील<br>५<br>६</td><td></td></tr>
<tr><td>७.</td><td colspan="2">पक्षी खरेदी मार्गदर्शक सूचनेप्रमाणे केली आहे काय ?</td><td>होय/ नाही</td></tr>
<tr><td>८.</td><td colspan="2">नव्याने घेतलेल्या पक्षांसाठी आवश्यक आकारमानाची निवा-याची सोय लाभार्थ्याने केली आहे काय ?<br>(प्रती पक्षी- १ चौ. फुट)</td><td>होय/ नाही</td></tr>
<tr><td>९.</td><td colspan="3">अनुदानाची गणना : (नव्याने घेतलेल्या पक्षांची संख्या, दर, अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>मापदंडानुसार पक्षी खरेदीची एकूण किंमत, रु. --------------<br>मापदंडानुसार निवाऱ्यासाठीचा एकूण खर्च, रु. -------------<br><br>अ.पक्षी खरेदी देय अनुदान रक्कम, रु. -----------<br>(१०० पक्षी खरेदी किमतीच्या ५०% जास्तीत जास्त रु. ५०००/-)<br>(१०० पक्षी खरेदी किमतीच्या ७५% जास्तीत जास्त रु. ७५००/-)<br>(पक्षी खरेदीच्या प्रमाणात पक्षांचे व निवाऱ्याचे अर्थसहाय्य देय आहे.)<br><br>ब.निवाऱ्यासाठी देय अनुदान रक्कम, रु.---------<br>(रु. ७०/- प्रति चौ.फु. या दराने १०० पक्ष्यांसाठी रु. ७,०००/- च्या ५०% रु. ३,५००/-)<br>(रु. ७०/- प्रति चौ.फु. या दराने १०० पक्ष्यांसाठी रु. ७,०००/- च्या ७५% रु. ५२५०/-)<br>(पक्षी खरेदीच्या प्रमाणात पक्षांचे व निवाऱ्याचे अर्थसहाय्य देय आहे.)<br>देय अनुदान - -------%<br>देय अनुदान रक्कम (अ+ब), रु. ------------------ (अक्षरी- ------------------------------ -------------)</td></tr>
</table>

नव्याने खरेदी केलेले पक्षी प्रकल्प मार्गदर्शक सूचनेतील निकषांप्रमाणे असून मार्गदर्शक सूचनेप्रमाणे खरेदी समिती समक्ष खरेदी केलेले आहे. इतर बाबींतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असलेने लाभार्थ्यास अनुदान रक्कम रु. ---------------- अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

समक्ष-

| | |
|---|---|
| लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी | कृषि सहाय्यक |
| (श्री./श्रीमती --------------------------) | (श्री./श्रीमती. --------------------) |
| | दिनांकित स्वाक्षरी |

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास दयावी.)

## प्रपत्र-५
## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

१. तपासणी दिनांक :- / /२०
२. तपासणी अधिकारी :- श्री. पदनाम
३. तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी -
   १. श्री. पदनाम
   २. श्री. पदनाम
४. लाभार्थ्याचे नाव - श्री.
   गांव ता. जि.
   सर्वे नं ( असल्यास )
५. बाब - परसबागेतील कुक्कुटपालन
६. प्रकल्पाचे ठिकाण
७. देयकाची एकुण रक्कम रु.
८. लाभार्थ्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु.
९. तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? होय / नाही
१०. नसल्यास तफावत रक्कम रु.
११. मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? होय / नाही
१२. लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय-

१३. गुणवत्ते बाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय-

**तपासणी अधिकारी, श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**
**पदनाम.**
**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**
**(नाव……………….)**

## भूमिहीन असल्याबाबत स्वयंघोषणापत्र

मी, श्री/श्रीमती------------------------------------- रा. ------------- ता. ---------------

जि. ---------

माझ्या कुटुंबातील सदस्य खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कुटुंबातील सदस्यांची नावे | वय | नाते |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

माझ्या अथवा माझ्या कुटुंबातील वर नमूद सदस्यांपैकी कुणाच्याही नावावर कोठेही शेतजमीन नाही.

सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/ किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण: .........................

दिनांक: ........................

अर्जदाराची सही: ...................................

अर्जदाराचे नाव : ....................................

(सोबत- तलाठी/तहसिलदार यांचे कुटुंब भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.)

## स्वयंघोषणापत्र

(विधवा महिलांसाठी)

मी ........................................................ विधवा असून पुनर्विवाह न केल्याचे स्वयंघोषित करत आहे. (नवऱ्याच्या मृत्यू नोंद दाखल्याची प्रत सोबत जोडलेली आहे.)

मी ................................................. श्री. ................................................. यांचा मुलगा/मुलगी वय ..................वर्षे, आधार कार्ड नंबर क्रमांक. ................................ व्यवसाय ........................ राहणार ............................. याद्वारे घोषित करते कि, वरील माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/ किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण: ..........................

अर्जदाराची सही: ...................................

दिनांक: .........................

अर्जदाराचे नाव : ....................................

# स्वयंघोषणापत्र

(परितक्त्या महिलांसाठी)

मी ..........................................................परितक्त्या असून मला नवऱ्याने सोडल्याचे/नवऱ्यास सोडल्याचे स्वयंघोषित करत आहे. (मा. न्यायालयाचे /सक्षम प्राधिकाऱ्याचे याबाबतचे आदेश सोबत जोडले आहेत.)

मी ................................................... श्री. .................................................... यांचा मुलगा/मुलगी वय .................वर्षे, आधार कार्ड नंबर क्रमांक. ................................ व्यवसाय ........................ राहणार .............................. याद्वारे घोषित करते कि, वरील माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/ किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण: ..........................  अर्जदाराची सही: ....................................

दिनांक: .........................  अर्जदाराचे नाव : ....................................

## स्वयंघोषणापत्र

(घटस्फोटीत महिलांसाठी)

मी ........................................................... घटस्फोटीत असल्याचे स्वयंघोषित करत आहे. (मा. न्यायालयाचे /सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश सोबत जोडले आहेत.)

मी .................................................. श्री. .................................................. यांचा मुलगा/मुलगी वय ..................वर्षे, आधार कार्ड नंबर क्रमांक. ................................ व्यवसाय ........................ राहणार ............................. याद्वारे घोषित करते कि, वरील माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि/ किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन. तसेच सदर स्वयंघोषणापत्राद्वारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यात येतील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण: ..........................

अर्जदाराची सही: ....................................

दिनांक: .........................

अर्जदाराचे नाव : .....................................